**गोपनीय**

क्रमांक : का.स./बैठक/२३७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२६-२-२०१३
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ.शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव, (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

———XOX———

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २३७वी बैठक

**दिनांक** : २८ जानेवारी, २०१३ (सोमवार)

**वेळ** : दुपारी ३.०० वाजता

**स्थळ** : मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,
(१४७ मुख्य), पहिला मजला
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जयन्त कुमार बाँठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.ना.वि.मिराणी | - | सदस्य |
| श्री.मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.तानाजी सत्रे<br>व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार),<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. राहुल अस्थाना<br>महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्रा. | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार)
सामान्य प्रशासन विभाग

श्री.मनुकुमार श्रीवास्तव
प्रधान सचिव, (उद्योग) (अतिरिक्त कार्यभार),
उदयोग, उर्जा व कामगार विभाग

श्री.एस.व्ही.आर.श्रीनिवास
अति.महानगर आयुक्त (१)/ प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.ग.पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श.म.सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.स.भ.तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

<u>बाब क्र.१</u> : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३६व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

<u>बाब क्र.२</u> : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३६व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

<u>बाब क्र.३</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशात नागरी घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व प्रक्रियेतून उर्वरित कच-याची भरावभूमीमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रवर्तकाची नेमणूक.</u>

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ९ नोव्हेंबर २०१२ रोजीच्या कार्यकारी समितीच्या २३६व्या बैठकीतील बाब क्र. ३ च्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल विषद केला. मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती हयांनी उपस्थित सदस्यांना त्यांचे अभिप्रायाबाबत विचारणा केली, त्यावर सदस्यांनी कार्यवाही अहवालास सर्वानुमते सहमती दर्शविली. त्यानंतर महानगर आयुक्तांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२च्या कार्यकारी समितीच्या बैठकित उपस्थित मुद्यांवर खुलासा करण्यासाठी हया प्रकल्पाचे "व्यवसाईक सल्लागार" मे. के.पी.एम.जी. ॲडव्हायजरी सर्विसेस यांचे प्रतिनिधी श्री. संतोष कामत व विधी सल्लागार मे. लिंक लिगल हयांचे प्रतिनिधी श्री. योगेश गुप्ता उपस्थित असून स्पष्टिकरणात्मक सादरीकरण करतील असे नमूद केले. त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती हयांनी सादरीकरणास अनुमती दिली.

३.२ मे. के.पी.एम.जी. ॲडव्हायजरी सर्व्हिसेस यांचे प्रतिनिधी श्री. संतोष कामत यांनी तळोजा येथील सामाईक भरावभूमीसाठी प्रकल्पाच्या निविदा अर्हतेबाबत, तसेच प्रकल्प अनुभवाबाबत कोणते निकष असावेत हे सुरुवातीपासून ठरविण्यात आले होते व निविदा तयार करताना अथवा प्रकल्पाच्या अनुषंगिक बाबी पूर्ण करताना कोणकोणत्या अनुभवी व मान्यवर संस्थांचा सहभाग घेण्यात आला होता आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली निविदा प्रक्रिया कशाप्रकारे पूर्ण करण्यात आली, हयाबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यांनी पुढे असे नमूद केले की, सहभागी होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांसमवेत करार करणे महत्वाचे असल्याने कराराचा मसूदा तयार केलेला असून तो सर्व सहभागी महानगरपालिका/नगरपरिषदांना अभिप्राय/सूचनांसाठी पाठविण्यात आला होता. त्यांचेसमवेत कराराबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी दिनांक १५ जानेवारी, २०१३ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यास सर्वांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. आता त्यास अंतिम स्वरुप देण्यात येत आहे. त्यानंतर, कार्यकारी समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या बैठकीत उपस्थित प्रश्नांबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आलाः-

अ) सदर बैठकीत अशी विचारणा करण्यात आली होती की, "स्वारस्य अभिव्यक्तिच्या" वेळी ३७ निविदाकारांनी भाग घेतला होता, तर प्रत्यक्षात चारच निविदाकारांनी निविदा सादर केल्या व हा प्रतिसाद अत्यंत अल्प आहे. त्याबाबत स्पष्टीकरण देताना मे. के.पी.एम.जी. ॲडव्हायजरी सर्व्हिसेस यांचे प्रतिनिधी श्री. संतोष कामत यांनी असा खुलासा केला की, "स्वारस्य अभिव्यक्तिच्या" वेळी प्रकल्प क्षमतेबाबतचे कोणतेही निकष ठेवण्यात आलेले नव्हते. त्यामुळे छोटया क्षमतेचे प्रकल्प उभारणी करणा-या १४ संस्थांनीदेखील त्यात भाग घेतला होता, तर मध्यम आणि मोठया क्षमतेच्या प्रकल्पाची उभारणी करणा-या एकंदर २३ संस्थांनी भाग घेतला व त्या एकमेव संस्था (single entity) असल्याने त्यातील ब-याचशा संस्थांनी परदेशातील संस्थांसमवेत सहभागी होण्यासाठी प्रयत्न केले. परंतु परदेशातील संस्थांनी भारत देशात गुंतवणुकीबाबत व निविदेच्या वेळी अन्य देशांमधील अस्थिर आर्थिक परिस्थितीमुळे (Recession) सहभागी होण्यास सहमती दर्शविली नाही. त्यामुळे नागरी घनकचरा व्यवस्थापनातील अन्य देशातील अग्रगण्य कंपन्यांनी हया प्रकल्पासाठी जरी सुरुवातीस स्वारस्य दाखविले होते, तरी त्या सहभागी झाल्या नाहीत, तर काही परदेशी संस्थांना भारत देशातील मान्यवर व योग्य सह-भागीदार उपलब्ध होवू शकले नाहीत, त्यामुळे निविदेत भाग घेण्यासाठी

असमर्थ ठरले. तसेच निविदेतील अर्हतेबाबतचे निकष अत्यंत काटेकोरपणे निश्चित केले असल्याने आंतरराष्ट्रीय निविदाकारांना सुयोग्य निविदाकारांची निवड करण्यासाठी अनेक प्रक्रिया पार पाडाव्या लागल्या. प्रत्यक्षात ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत असे वरकरणी दिसत असले तरी, हया प्रकल्पासाठी १२ संस्था सहभागी झालेल्या आहेत व कन्सोरटियम पार्टनर म्हणून सहभागी झालेल्या संस्थाना हया क्षेत्रातील दिर्घ अनुभव आहे, त्यामुळे हा प्रतिसाद उत्तम वाटतो.

अतिरिक्त महानगर आयुक्त (२) हयांनी असे नमूद केले की, मे. लार्सन अँड टूब्रो, मे. व्हिओलिया, मे. कॅपेल सेहगल, मे. इंटरजिओ सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट हया मान्यवर कंपन्यांनी हया प्रकल्पासाठी सुरुवातीपासून स्वारस्य दाखविले होते, परंतु वरील कारणास्तव सहभागी होवू शकल्या नाहीत. मे. युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लिमिटेड हया कंपनीने कन्सोरटियम पार्टनर म्हणून मे. रिमॉन्डीस (जर्मनी) हया जागतिक पातळीवर मान्यवर असलेल्या कंपनीसमवेत जरी निविदा सादर केली, तरी त्यांचेकडून पुरेसे तांत्रिक पाठबळ न मिळाल्याने "तांत्रिकी योग्यता चाचणी" (Technical Suitability Test) मध्ये अपात्र ठरले.

M/s.Sanfeng Environmental Industries Group Co. Ltd.,आणि मे.सतेराम, मे.जीडीई, मे.सद्भाव हया कंपन्यांनी त्यांच्या दिर्घ अनुभवाचा फायदा अनुक्रमे मे.रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड व मे. प्रतिभा इंडस्ट्रिज लिमिटेड हया निविदाकारांना मिळाल्यामुळेच हे निविदाकार अर्हतेत पात्र ठरले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदा प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पूर्ण केलेली आहे व दिर्घ मुदतीच्या हया प्रकल्पासाठी योग्य व सक्षम प्रवर्तकाची नेमणूक होण्याच्या दृष्टीने अत्यंत काटेकोरपणे छानणी केलेली आहे.

ब) मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांचेकडून भारत देशात अन्य ठिकाणी राबवित असलेल्या प्रकल्पांची माहिती घेतली असता असे आढळून आले की, मे. रामकी ग्रुप हया कंपनीकडून एकंदर ६८ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येत आहेत, त्यातील ४८ प्रकल्प हे मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांचे नावावर असून २० प्रकल्प मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चरचे नावावर आहेत. त्यापैकी १४ प्रकल्प हे जैव-वैद्यकिय कचरा (Bio-medical Waste) मधील असून १४ हे घातक कच-यावरील (Hazardous Waste

Management) आहेत, तर २२ नागरी घनकचरा व्यवस्थापनेतील असून प्रक्रिया व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाटीसाठीचे ९ प्रकल्प कार्यरत आहेत.

M/s.Sanfeng Environmental Industries Group Co. Ltd.,हया कंपनीसमवेत दिल्ली, चेन्नई, हैद्राबाद व मुंबई येथे असे ४ प्रकल्प राबविण्यासाठी "सामंजस्य करार" अध्यक्ष, नियोजन आयोग, हयांचे अध्यक्षतेखाली नुकताच नोव्हेंबर, २०१२ मध्ये करण्यात आलेला आहे. मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांच्याकडून दिल्ली व हैद्राबाद येथील नवीनच उभारण्यात येणा-या प्रकल्पांची पहाणी प्राधिकरणामधील घनकचरा व्यवस्थापन विभागातील अधिकारी व मे. के.पी.एम.जी. ॲडव्हायजरी सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड हयांचे प्रतिनिधी हयांनी नुकतीच केली असता दोन्ही प्रकल्पांचे काम अद्याप पूर्ण होत असले तरी, दिल्ली येथील प्रकल्पात १२०० मे. टन प्रति दिन क्षमतेचा कंपोस्ट प्लान्ट व ३३०० मे.टन प्रतिदिन क्षमतेचा हैद्राबाद येथील कंपोस्ट प्लान्ट समाधानकारकरित्या चालू असल्याचे निदर्शनास आले आहे.

दिल्ली येथील प्रकल्पासाठी M/s.Sanfeng Environmental Industries Group Co. Ltd. हया कंपनीकडून इन्सिनरेशन प्लान्ट उभारण्यासाठीची स्थापत्य कामे सुरु असून मशिनरी उभारण्यासाठीचे भव्य गर्डर व इतर बांधकाम साहित्य त्या कंपनीने पुरविले आहेत. इन्सिनरेशन प्लान्ट ऑगस्ट/सप्टेंबर, २०१३ मध्ये कार्यान्वित होणे अपेक्षित आहे अशी माहिती मिळाल्याचे सांगितले.

३.३ चर्चेदरम्यान, कार्यकारी समितीचे निमंत्रित श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, हयांनी बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य ठिकाणी मे. रामकी हया कंपनीने त्यांना सुपूर्द केलेली कामे केली नाहीत त्यामुळे त्यांना काळया यादीत टाकल्याचे व अन्य कारवाईबाबत माहिती व कार्यक्षमता अहवाल प्राप्त करावा असे मागील बैठकीत ठरविण्यात आले त्याबाबत विचारणा केली. त्यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) हयांनी खालील तपशिल नमूद केला:-

अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांना कचरा संकलन व परिवहनाचे कंत्राट ६ वर्षापूर्वी दिले होते व ते त्यांनी पूर्ण केले. त्यांना प्रक्रिया व शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्पाचे कोणतेही काम देण्यात आले नव्हते. परंतु कांजूर येथील शास्त्रोक्त भरावभूमी प्रकल्पासाठी त्यांनी निविदा सादर केली होती.

त्यामध्ये ते पुरेशा अनुभवाची पात्रता सिध्द करु शकले नाहीत. त्यांनी सादर केलेल्या परदेशातील कंपनीच्या अनुभवाच्या प्रमाणपत्राबाबतचा पुरावा सिध्द करु न शकल्याने ते अपात्र ठरले. तसेच त्यांनी त्याबाबत मा. उच्च न्यायालयात सादर केलेली याचिका त्याचवेळी निकाली निघाली.

ब) मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चर हया संस्थेस पुणे महानगरपालिकेने त्यांना दिलेले मलनि:सारण प्रक्रिया प्रकल्पाचे काम विहित वेळेत व मुदतवाढ देवूनही पूर्ण न केल्याने काळया यादीत टाकण्याची कार्यवाही सुरु केली होती. परंतु त्यांनी हे काम पूर्ण केल्याने व देखभालीचा कालावधी सुरु झाल्याने कार्यवाही रद्द केल्याची कागदोपत्री माहिती पुणे महानगरपालिकेकडून घेण्यात आली आहे.

क) मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांना Sustainable Urban Development Project थ्रिसूर कार्पोरेशनने "लरुर" येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम दिले होते. तेथील कामामध्ये दिरंगाई झाल्याने त्यांच्या Performance Guarantee व Mobilization Guarantee चे रोखीकरण का करण्यात येवू नये अशी "कारणे दाखवा नोटीस" त्यांना बजावण्यात आली होती. सदर बाबत कागदोपत्री माहिती घेतली असता त्या संस्थेने कारवाई मागे घेवून बँक हमीच्या मुदतीत वाढ देण्यासाठी पत्र दिल्याचे आढळून आले आहे.

(ड) मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ५०० मे.टन क्षमतेचा कंपोस्ट व कच-यापासून विद्युत निर्मिती प्रकल्प मोशी येथील क्षेपणभूमीवर उभारण्याचे काम दिले होते. त्यामध्ये EPC-cum-O&M कंत्राट आणि विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम होते. त्यातील इपीसी कंत्राट मे. रामकी हयांनी पूर्ण केले व काही कारणांमुळे विवाद निर्माण झाल्याने कच-यापासून विद्युत निर्मिती प्रकल्पाची उभारणी होवू शकली नाही. सध्या हा कंपोस्ट प्लान्ट पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ताब्यात घेऊन अन्य कंपनीव्दारे चालविण्यात येत आहे. हे प्रकरण लवादाकडे सूपुर्द केले आहे अशी माहिती मिळाली.

वरील माहितींवरुन असे दिसून येते की, मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांना कोणत्याही प्रकल्पामध्ये काळया यादीत टाकण्याची कारवाई झालेली नाही अथवा त्यांनी कोणत्याही प्रकल्पाचे काम अर्धवट सोडलेले नाही, म्हणून

..८/-

मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांना कोणत्याही कारणास्तव हया निविदेत अपात्र ठरविता येणार नाही.

३.४. कार्यकारी समितीचे निमंत्रित श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, हयांनी असे निदर्शनास आणले की, मे. रामकी हया कंपनीवर CBI ने आर्थिक गैरव्यवहाराबाबत गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत व त्यांची छाननी सरकारी यंत्रणेमार्फत चालू आहे असे समजते. तरी त्याबाबत तपासणी करुन माहिती घेण्यात यावी. तसेच निविदेची छाननी "सीव्हीसी (Central Vigilence Commission)"मार्गदर्शकानुसार करण्यात येवून त्यानंतरच त्यांना हया प्रकल्पाचे काम सुपूर्द करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा असे सूचित केले. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. सिताराम कुंटे, महापालिका आयुक्त व देबाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग हयांनी "सीव्हीसी" मार्गदर्शकानुसार छाननी करण्यात यावी असे सूचित केले. याबाबत CBI चौकशी ही मे. रामकी एन्व्हायरो प्रा. लि. या सदर प्रकल्पाच्या यशस्वी निविदाधारक कंपनीची असोसिएट कंपनी असलेल्या मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीशी संबधित असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

३.५ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग हयांनी असे सूचित केले की, मे. रामकी हयांची निविदा वरील CBI च्या छाननीमुळे विधित: अपात्र ठरत आहे का? हयाबाबत चाचणी करण्यात यावी. तसेच त्यामध्ये अवधी लागत असल्यास निविदेची विधिग्राहयता पुरेशी वाढवून घेण्यात यावी.

कार्यकारी समितीचे सन्माननीय सदस्य श्री.द.म.सुकथनकर, श्री. ना.वि.मिराणी तसेच मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रकल्पाची निविदा अत्यंत पारदर्शक पध्दतीने व अथक परिश्रम घेऊन योग्य रीतीने पार पाडल्याची आवर्जून नोंद घेतली. मात्र सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर CBI तपासणीचा मुद्दा उपस्थित झाला असल्याने तो तपासून घेणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेतील पारदर्शकता, प्रकल्पातील गुंतागुंत व व्यामिश्रता लक्षात घेऊन केलेली प्रकल्पाची रचना, सदर प्रकल्पामुळे भविष्यकाळात नागरीक स्वराज्य संस्थाना होणारा फायदा आणि पारदर्शक निविदा प्रक्रियेतून निवडला गेलेला निविदाकार हे मुद्दे विचारात घेऊन सदर निविदा मान्य करावी असे स्पष्ट अभिप्राय राज्य शासनाचे पी.पी.पी. तज्ञ श्री. अजय सक्सेना यांनी दिले.

याबाबत मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती, हयांनी महानगर आयुक्तांना अभिप्रायार्थ विचारणा केली असता त्यांनी असे नमूद केले की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हया निविदाकाराची प्रकल्पासाठीची सक्षमता (competence) आम्ही सखोलपणे तपासली आहे, परंतु, केंद्रीय दक्षता आयोगाच्या (सी.व्ही.सी.) मार्गदर्शकानुसार जर छाननी करावयाची असल्यास त्याप्रमाणे छाननी करण्यास हरकत नसावी. परंतु निविदाकाराने दोन वेळा विधिग्राहयता वाढविली असल्याने व सध्याची विधिग्राहयता १५ मार्च, २०१३ पर्यंत असल्याने हयाबाबत लवकर निर्णय घेणे योग्य होईल.

मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती हयांनी असे सूचित केले की हयामध्ये विधित: तपासणी करण्याचा प्रश्न जरी नसला व निविदा अपात्र ठरत नसली तरी हयाबाबत केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शकानुसार तपासणी करुन सदर प्रस्ताव पुढील बैठकीत निर्णयासाठी ठेवावा.

३.६ श्री. योगेश गुप्ता, विधी सल्लागार, मे. लिंक लिगल हयांनी तळोजा येथील प्रकल्पासाठी प्रवर्तकास जागा भाडेपटटयावर (Lease) देताना करारात "त्रयस्थांचे हितसंबंध" (Third Party Interest) तयार होवू नयेत म्हणून कोणकोणत्या तरतूदी आहेत हयाबद्दल सविस्तर सादरीकरण केले. सदर करारात प्रवर्तकास देण्यात येणा-या जमिनी कर्जपुरवठादाराकडे तारण अथवा गहाण ठेवता येणार नाहीत अशी स्पष्ट अट असून, जर करारातील तरतूदींचा भंग झाल्यास तो "Event of Default" तयार होवून प्रसंगी करार रद्द होवू शकतो अशा तरतूदी आहेत. कराराचा मसूदा तयार करताना सर्वप्रकारे दक्षता घेण्यात आली आहे. करारातील अटी व शर्तीबाबत काटेकोर मांडणी केलेली असून सर्व बाबींची विधित: तपासणी करण्यात आली आहे असे नमूद केले. "सवलत करारनाम्याचा" कालावधी संपुष्टात आल्यानंतर भाडेपटटयावर देण्यात आलेल्या जमिनीचा करार (Land Lease Agreement) आपोआप संपुष्टात येण्याची तरतूददेखील (co-terminus) करारात समाविष्ट असल्याचे निदर्शनास आणले.

श्री.योगेश गुप्ता, विधी सल्लागार, मे. लिंक लिगल, हयांनी असादेखील खुलासा केला की, जागा प्रवर्तकास परवाना (License) तत्वावरसुध्दा देता येऊ शकते, परंतु परवाना तत्वावर जागा अल्पमुदतीकरिता असून वारंवार नुतनीकरण करावे लागते. प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात कर्जाचा

पुरवठा करताना कर्जपुरवठादार (Lender) जागा परवाना तत्वावर कधीच मान्य करीत नाही, त्यामुळे प्रकल्प अडचणीत येवू शकतो. त्यानंतर जागा भाडेपटटयावर देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती हयांनी असे सूचित केले की, मोठया प्रमाणात भांडवली मालमत्ता तयार होणा-या प्रकल्पासाठी जागा भाडेपटटयावर देण्याशिवाय पर्याय नसेल तर प्रवर्तकास जागा भाडेपटटयावर देण्याबाबतचा निर्णय घेणे योग्य होईल असे मत नोंदविले.

३.७ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. सिताराम कुंटे, महापालिका आयुक्त हयांनी असे सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने देखील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी प्रवर्तकास जागा भाडेपटटयावर देण्याबाबतचे प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले होते व अनेक वेळा पत्रव्यवहार व पाठपुरावा केलेला आहे परंतु, निर्णय झालेला नाही. जर प्रवर्तकास जागा भाडेपटटयावर देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असेल तर तोच निर्णय मुंबई महानगर पालिकेस लागू व्हावा.

त्यावर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती, हयांनी असे सूचित केले की, प्रवर्तकास प्रकल्पासाठी जागा भाडेपटटयावर देण्याबाबत तळोजा प्रकल्पांतर्गत करण्यात आलेली तरतूद ही उचित आढळून येते मात्र याबाबत समानता राखण्यासाठी अशा जागा भाडेपटटयावर देण्याबाबतच्या अटी व शर्तीबाबत नगर विकास विभागाने तपासणी करुन त्याबाबतची समानता राखण्यात यावी.

३.८ उपरोक्त चर्चेनुसार, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती हयांनी मे. रामकी एन्व्हायरो इंजिनियर्स लिमिटेड हयांच्या निविदेची छाननी "सीव्हीसी" मार्गदर्शकानुसार तपासणी करुन अहवाल कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत सादर करावा असे निर्देश दिले.

**बाब क्र.४ : वडाळा वाणिज्यक केंद्राकरिता बृहत योजना तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वडाळा भारवाहक तळासाठी (१०९.२४ हेक्टर) विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून तयार केलेल्या नियोजन प्रस्ताव आणि विकास

नियंत्रण विनियमावलीस शासनाने अनुक्रमे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१० तसेच दिनांक १० जानेवारी, २०११ रोजीच्या अधिसुचनेनुसार अंतिम मंजूरी दिली आहे. सदर मंजूर विकास नियंत्रण विनियमावलीनुसार वडाळा भारवाहक तळासाठी ग्लोबल ४.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. मुंबईची आर्थिक अभिवृध्दि आणि वाणिज्यिक क्षमता लक्षात घेता, वडाळा अधिसुचित क्षेत्राचे विकसन हे अस्तित्वात असलेल्या नरीमन पॉईंट आणि वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर वाणिज्यिक केंद्र म्हणून विकास करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वडाळा वाणिज्यिक केंद्राकरीता सविस्तर आराखडा बृहतयोजना (detailed layout Master Plan) तयार करण्यासाठी सल्लागार संस्थांकडून स्वारस्य अभिव्यक्ति (Expression of Interest) मागविले असता देशातून व परदेशातून एकूण ५३ सल्लागार संस्थांनी इच्छूक असल्याचे कळविले. त्यापैकी १२ सल्लागार संस्थांकडून तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्याबाबत मुल्यमापन समितीने शिफारस केली. त्यापैकी ८ सल्लागारांकडून प्रस्ताव प्राप्त झाले. तांत्रिक प्रस्ताव व सादर केलेले दस्ताऐवज आणि ४५ मिनिटांचे सादरीकरण यांच्याआधारे व प्रस्तावाच्या विनंतीनुसार (Request for proposal) दुस-या मुल्यमापन समितीने या प्रस्तावांचे मुल्यमापन केल्यानंतर ४ सल्लागारांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्याबाबत शिफारस केली. प्रस्तावाच्या विनंती (Request for proposal) मध्ये विहीत पध्दतीनुसार तांत्रिक व आर्थिक प्रस्तावाच्या संयुक्तीक गुणांनुसार M/s.Edifice Consultants Pvt. Ltd., Mumbai यांनी सर्वात जास्त गुण मिळविल्याने त्यांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्याबाबत मुल्यमापन समितीने शिफारस केली. त्यानुसार, M/s.Edifice Consultants Pvt. Ltd., Mumbai यांची वडाळा वाणिज्यिक केंद्र म्हणून विकास करण्याचा सविस्तर आराखडा बृहतयोजना (detailed layout Master Plan) तयार करण्यासाठी सल्लागार म्हणून रु.२.४० कोटी व कर इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

४.२ वरील प्रस्तावाबाबत श्री.द.म.सुकथनकर सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, मुंबईमध्ये वेगवेगळया प्रकल्पांसाठी वेगवेगळे विशेष नियोजन प्राधिकरण असून धारावी झोपडपट्टी पुर्नविकसन, वांद्रे-कुर्ला संकुल, इ. ठिकाणी ४.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबईचा विकास आराखडा तयार करीत असून, सदर बृहत योजना त्यांच्याशी सुसंगत असली पाहिजे. पुढे त्यांनी अशी विचारणा केली की, सदरचे क्षेत्र हे भाभा परमाणु अनुसंधान केंद्राच्या (BARC) जवळ आहे त्यामुळे इथे अशाप्रकारचे प्रस्तावित विकसन करणे शक्य होईल किंवा कसे? त्याअनुषंगाने वडाळा भारवाहक तळाच्या आसपासच्या व लगतच्या

जागेचा अभ्यास करुन मगच सदर प्रस्तावित वडाळा वाणिज्यिक केंद्राची बृहत योजना तयार करावी. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळासाठी शासनाने यापूर्वीच वडाळा नियोजन प्रस्तावास मान्यता दिली आहे तसेच भाभा परमाणु अनुसंधान केंद्र (BARC) यांनी वडाळा भारवाहक तळामधील एका मोठया क्षेत्राच्या प्रकल्पास त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र देखील दिलेले आहे.

४.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, अस्तित्वात असलेल्या नरीमन पॉईंट, वांद्रे-कुर्ला संकुल, फोर्ट, इ. वाणिज्यिक केंद्राप्रमाणे सदर वडाळा वाणिज्यिक केंद्राचे विकसन करण्याकरीता किती क्षेत्र उपलब्ध आहे. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, वडाळा वाणिज्यिक केंद्राचे बांधकाम क्षेत्र अंदाजे ३२० हेक्टर इतके आहे. म्हणजेच वांद्रे-कुर्ला संकुलाच्या तुलनेत सदरचे क्षेत्र साधारणतः अर्धे आहे. परंतू जमिनीचे क्षेत्र हे फार कमी असल्यामुळे सदर क्षेत्राच्या जास्तीत जास्त संभाव्य उपयोगाकरीता सल्लागाराची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

४.४ कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सदरची जमीन ही प्राधिकरणाची असल्यामुळे, प्राधिकरण सदर क्षेत्राचे जास्तीत जास्त संभाव्य उपयोग करेल. त्याकरीता प्राधिकरणाने पायाभुत सोयीसुविधांचा अभ्यास करुन सदर क्षेत्राचे विकसन केले पाहिजे आणि त्याअनुषंगाने आराखडा तयार केला पाहिजे. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, विचारार्थ विषयामध्ये (Terms of Reference) वरील सर्व विषयांची जसे की, अस्तित्वातील जमीनीच्या वापराचे सर्वेक्षण करणे ज्यामध्ये प्राकृतिक, भूकर विषयक, पायाभूत सुविधा, बाजारपेठेतील मागणीचे सर्वेक्षण, इतर आवश्यक सर्वेक्षण आणि माहिती व त्यांचे अस्तित्वातील स्थितीचे विश्लेषण करुन, त्याआधारे निष्कर्ष काढून बृहत योजनेचे विविध पर्याय बनविणे इत्यादी विषयांचा समावेश आहे. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, वरील सर्व विषयाव्यतिरिक्त काही विषय राहिल्यास तसे सल्लागारांना कळविण्यात येईल व सदर बृहत योजना तयार करतेवेळी आवश्यकता वाटल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेचा सल्ला घेण्यात येईल. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राधिकरण या क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांच्या विकसनासाठी (पाणीपुरवठा, मलनिःसारण, पर्जन्य जलवाहिनी इत्यादी) बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्रमाणबध्द खर्च अदा करणार आहे.

४.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

<u>ठराव क्र. १२१९:</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे वडाळा वाणिज्यिक केंद्र म्हणून विकास करण्याचा सविस्तर आराखडा बृहतयोजना तयार करण्यासाठी M/s. Edifice Consultants Pvt. Ltd., Mumbai यांची रु. २.४० कोटी व कर इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या कामाचा आढावा घेणे व सदर वडाळा वाणिज्यिक केंद्र म्हणून विकास करण्याकरीता सविस्तर आराखडा बृहतयोजना (detailed layout Master Plan) वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.५ :</u> <u>मोनोरेलला मध्य रेल्वेच्या वडाळा व करी रोड येथील रुळ ओलांडण्यासाठी बांधण्यात येणा-या पुलाच्या पर्यवेक्षणाचे काम करण्याकरिता लागणा-या अतिरिक्त खर्चास मान्यता मिळणेबाबत (मे.राईटस्)...</u>**

५९५

५.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, टप्पा-२ - वडाळा संत गाडगे महाराज चौक ही मोनोरेल मार्गिका मध्य रेल्वेच्या वडाळा व करी रोड रेल्वे रुळ ओलांडून जाते. सदर रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी मध्य रेल्वेकडून परवानगी घेण्यात आली असून दिनांक ०३ जानेवारी, २०१२ रोजी मध्य रेल्वेबरोबर करारनामा करण्यात आला आहे. सदर मध्य रेल्वेचे रुळ ओलांडण्यासाठी लोखंडी तुळईचा उपयोग केला जाणार असून वडाळा येथे अंदाजे ४० मीटरचा स्पॅन (Span) आणि करी रोड येथे ५० मीटरचा स्पॅन (Span) घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार, रेल्वे रुळ ओलांडणा-या पूलाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मध्य रेल्वेने सल्लागार म्हणून मे. राईटस् आणि मे. इरकॉन या रेल्वे अंगीकृत संस्थांची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने मे. राईटस् यांची वडाळा व करी रोड येथे मोनोरेलला रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी बांधण्यात येणा-या पर्यवेक्षणाचे काम करण्यासाठी रु. १.३५ कोटी (सेवा कर

वगळून) इतक्या रक्कमेवर नियुक्ती करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

५.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, मध्य रेल्वेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार, कलम ४ (अ) (१३) अन्वये रेल्वे रुळ ओलांडणा-या सर्व लोखंडी तुळईची चाचणी करण्याचे काम मे. आर.डी.एस.ओ. मार्फत करावयाचे व त्यासाठी लागणारा खर्च प्राधिकरणाने करावयाचा आहे. रेल्वे रुळ ओलांडणा-या पुलाच्या पायाचे, उप-संरचेना आणि लोखंडी तुळई उभारणीचे काम मे. राईटस् यांच्या कार्यव्याप्तीमध्ये असून लोखंडी तुळईचे संविरचना (fabrication) व कारखान्यामध्ये चाचणी करण्याचे काम मे. आर.डी.एस.ओ. यांचे आहे. परंतू दोन वेगवेगळया संस्थांमध्ये समन्वय साधणे कठीण असून त्याचा विपरीत परिणाम कामाच्या प्रगतीवर होण्याची शक्यता आहे. अंधेरी येथील मेट्रो लाईन-१ आणि मिलन सब-वे येथील उड्डाणपूलाचे पर्यवेक्षण आणि लोखंडी तुळई चाचणीचे काम मे. राईटस् यांनी केलेले आहे. मध्य रेल्वेने सदर बाब मे. आर.डी.एस.ओ. यांच्या निदर्शनास आणली असता त्यांनी सद्यस्थितीतील कार्यभार आणि बांधण्यात येणारा पुल रेल्वेकरिता नसल्याने मोनोरेलचे लोखंडी तुळईचे चाचणीचे काम करण्यास असमर्थता दर्शविली. तद्नंतर मध्य रेल्वेने कलम ४ (अ) (१३) दुरुस्त करुन त्यामध्ये मे.आर.डी.एस.ओ. ऐवजी मे.राईटस् आणि मे.ईरकॉन यांची शिफारस केली आहे. मे.आर.डी.एस.ओ. तर्फे रेल्वेसाठी पुलाच्या लोखंडी तुळईचे संविरचनाकरिता मे.जे.सी.एल.इन्फ्रा लि. हे प्रमाणित कंत्राटदार असून त्यांची मे.लार्सन ॲन्ड टुब्रो, इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बीएचडी, मलेशिया समुहाने मोनोरेलला रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी लागणा-या पुलाचे बांधकाम करण्याकरिता नियुक्ती केली आहे. मे. जे.सी.एल.इन्फ्रा लि. यांनी शालात्य नकाशा (Shop Drawings) सादर केला असून साहित्य खरेदी करण्यास सुरवात केली आहे. मे.एल.टी.एस.ई. (LTSE) यांनी मेरठ येथे साहित्यांची चाचणी करण्यासाठी विनंती केली असून जानेवारी अखेरीस संविरचनेचे काम सुरु करण्याचे योजिले आहे.

५.३ महानगर आयुक्त यांनी माहिती देताना पुढे असे सांगितले की, मे.राईटस् या संस्थेकडून वडाळा व करी रोड येथील रेल्वे रुळ ओलांडण्याठी लागणा-या लोखंडी तुळईच्या चाचणीचे काम मे.जे.सी.एल.इन्फ्रा लि. यांच्या मेरठ येथील कारखान्यामध्ये करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात आला होता. त्यानुसार, मे.राईटस् यांनी प्राधिकरणास सदर चाचणीसाठी प्रती तुळई रुपये १० लाख

..१५/-

प्रती महिना (सेवाकर वगळून) आणि एकूण फी रु.८० लाख आठ तुळईसाठी (सेवाकर वगळून) मिळावी असा प्रस्ताव सादर केला आहे. त्या व्यतिरिक्त तुळईची चाचणी करण्याकरिता दोन अधिका-यांचा मुंबई ते दिल्ली परतीचा विमान प्रवास खर्च प्राधिकरणाने करावा असे सूचित केले आहे. तसेच एकूण फी रु. ८० लाख संपल्यानंतर सुध्दा जर लोखंडी तुळईचे काम अपूर्ण राहिले तर उर्वरित तुळईच्या चाचणीचे काम मे. राईटस् मार्फत कोणत्याही प्रकारची अतिरिक्त फी न आकारता करण्यात येईल. परंतू, सदर कामासाठी लागणा-या दोन अधिका-यांचा मुंबई ते दिल्ली परतीचा विमान प्रवास खर्च प्राधिकरणाने करावा. अशाच प्रकारच्या कामासाठी मे. राईटस् यांनी (मिलन आर. ओ.बी. येथील पूलाच्या कामासाठी - बंगलुर येथे चाचणी) रुपये १२ लाख प्रती लोखंडी तुळई (सेवाकर वगळून) अशी फी आकारली आहे. ८ लोखंडी तुळईच्या संविरचनेचे काम ८ महिन्यांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे मे. राईटस् यांची एकूण फी रु. ८० लाख (सेवाकर वगळून) इतकी असून सदर फी वाजवी आहे.

५.४ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२२० :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. राईटस् या संस्थेच्या प्रस्तवाचा विचार करुन ८ लोखंडी तुळईच्या संविरचनेच्या चाचणीचे काम करण्यासाठी रु. ८० लाख (सेवा कर वगळून) व दोन अधिका-यांचा मुंबई ते दिल्ली परतीचा विमान प्रवास खर्च (अतिरिक्त खर्च) या रक्कमेवर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.६ :</u> <u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य महामार्ग क्र.४१ ची सुधारणा करणे (भाग जुचंद्र फाटा ते नायगाव रेल्वे स्टेशन).</u>**
**<u>- सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस मंजुरी प्रदान करण्याबाबत.</u>**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या

..१६/-

दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या १२०व्या बैठकीमध्ये प्राधिकरणाने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्ता बळकटीकरण करणे, उड्डाणपुल बांधणे, रेल्वे उड्डाणपूल बांधणे इ. कामांकरीता ठराव क्रमांक ११४८ अन्वये रु.१४९३.२६ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. सदर मंजूर कामांमध्ये नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य महामार्ग क्र.४१ ची सुधारणा करणे (भाग जुचंद्र फाटा ते नायगाव रेल्वे स्टेशन) या कामाचा रु.५६.२५ कोटी रक्कमेसाठी समावेश आहे. सदर कामाच्या रु.३२.०० कोटी अंदाजित रक्कमेच्या निविदा दिनांक २५ फेब्रुवारी, २००९ रोजी मागविण्यात आल्या होत्या. परंतू अंदाजपत्रकातील प्रस्तावित रस्त्याची आखणी (Alignment) ही मंजूर विकास आराखडयाप्रमाणे नसल्याने कामाच्या निविदा दिनांक २६ जून, २००९ रोजी पुन्हा मागविण्यात आल्या होत्या. रस्त्याच्या मंजुर विकास आराखडयातील आखणी (Alignment) प्रमाणे कामाची अंदाजित रक्कम रु.५३.०५ कोटी होती. परंतु ही निविदा प्रक्रिया पुढील कारणास्तव प्रलंबित ठेवण्यात आली होती :-

अ) पश्चिम रेल्वेकडून रेल्वे उड्डाणपुलाच्या नकाशांना मंजुरी प्रलंबित होती.

ब) रेल्वे उड्डाणपुलाच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विभागाची मंजुरी प्राप्त झाली नव्हती.

क) मिठागरांची जमिन संपादीत/हस्तांतरीत झाली नव्हती.

ड) कामाच्या जागेवरील तिवरांची झाडे काढण्यास उच्च न्यायालयाची परवानगी प्राप्त करणे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, पश्चिम रेल्वेकडून या प्रकल्पाच्या नकाशांना दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून (MCZMA) या प्रकल्पास दिनांक ०२ जुलै, २०१२ रोजी ना हरकत पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार तिवरांची झाडे हलविण्याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे प्राधिकरणाच्या विधी शाखेकडून शपथपत्र सादर करण्यात येत आहे.

रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करण्याकरिता आवश्यक असलेल्या जागेचे भूसंपादन/हस्तांतरण करण्याकरीता येथील जागेची संयुक्त मोजणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, वसई यांच्या कार्यालयाकडून माहे मार्च, २०१२ मध्ये करण्यात आली आहे. राज्य महामार्ग क्र.४१चे रुंदीकरण व रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामाकरीता पश्चिम रेल्वेने मंजुर केलेल्या

..१७/-

आराखडयानुसार ठाणे जिल्हयाच्या सन २०११-१२च्या जिल्हा दरसुचीनुसार कामाची अंदाजित रक्कम रु.१०७.५० कोटी एवढी आहे. सदर रक्कम मुळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा (रु.५६.२५कोटी) ९१.११% अधिक असून त्याची ढोबळमानाने कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | प्रकल्पाच्या खर्चाच्या वाढीची कारणे | अधिक्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | जिल्हा दरसुचीतील दरात झालेल्या वाढीमुळे | रु.१४.१८ कोटी |
| २ | नायगाव स्थानकाच्या पश्चिमेस नियोजित उड्डाणपुलास एक अतिरिक्त पोचमार्ग प्रस्तावित केल्यामुळे | रु. २.५० कोटी |
| ३ | पश्चिम रेल्वेच्या आवश्यकतेनुसार काँक्रिटचे गर्डरऐवजी लोखंडी गर्डर. | रु. १.५६ कोटी |
| ४ | पर्यावरण विभागाच्या सुचनेनुसार व्हायाडक्ट पध्दतीचा रॅम्प प्रस्तावित आहे. | रु. २.०० कोटी |
| ५ | पोहोचमार्गाची लांबी वाढल्यामुळे | रु. ९.७० कोटी |
| ६ | रस्त्याची रुंदी ७.००मी. ऐवजी १०.५०मी. एवढी प्रस्तावित असल्यामुळे | रु. १३.९१ कोटी |
| ७ | रेल्वेला अदा करायची फी | रु. ७.५० कोटी |
| | **एकुण वाढ रुपये** | **रु. ५१.३५ कोटी** |

६.३ महानगर आयुक्तांनी पुढे असे सांगितले की, नियोजित रेल्वे उड्डाणपुलामुळे वसईच्या पश्चिमेकडील रहिवाशांना वाहतुकीस त्याचा मोठा फायदा होणार असून वसई (पश्चिम) ते मुंबई हे अंतर सुमारे १० कि.मी. एवढे कमी होणार आहे. त्यामुळे वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. यास्तव नियोजित कामाबाबत विधानसभेतील सदस्यांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून विधानसभेच्या उत्तराच्या चर्चेत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ जुलै, २०१२ रोजी विधानसभेत प्रस्तावित काम ६ महिन्याच्या कालावधी/जमिनीचा ताबा प्राप्त होताच सुरु करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. सबब या कामाच्या निविदा मागवून काम सुरु करणे आवश्यक असल्याने कामाच्या सुधारीत रक्कमेस मंजुरी प्रदान करावी अशी विनंती कार्यकारी समितीस करण्यात येत आहे.

चर्चेमध्ये, श्री. ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे विचारले की, सद्यःस्थितीमध्ये या रस्त्यावर किती वाहनवर्दळ आहे व भविष्यात किती होणार आहे. यावर मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, सद्यःस्थितीमध्ये रेल्वे ओलांडण्यासाठी व्यवस्था नसल्यामुळे येथील वाहनवर्दळ ४२०० पी.सी.यु. आहे. तथापि, काम पुर्ण झाल्यावर सन २०१५ मध्ये २२५००

..१८/-

पी.सी.यु. एवढी अपेक्षित आहे. यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे विचारले की, सद्यःस्थितीत रस्त्याची रुंदी किती आहे आणि रस्ता ४ मार्गिकेचा करण्याकरिता किती वाहनवर्दळ आवश्यक आहे? मुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, सद्यःस्थितीत रस्त्याची रुंदी १८ मी. ROW असून २ मार्गिकेचा रस्ता हार्ड शोल्डरसह प्रस्तावित करण्यात आला आहे. २ मार्गिकेचा रस्ता शोल्डरसह करण्याकरीता २०००० पी.सी.यु. प्रती दिन एवढी वाहनवर्दळ आवश्यक आहे. भविष्यात वाहनवर्दळ वाढल्यानंतर रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव टप्या टप्याने विचारात घेण्यात येईल.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला:-

<u>ठराव क्र. १२२१ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नायगाव-जुचंद्र-बापाणे राज्य महामार्ग क्र.४१ ची सुधारणा करणे (भाग जुचंद्र फाटा ते नायगाव रेल्वे स्टेशन) या कामाच्या रु. १०७.५० कोटी इतक्या सुधारीत रक्कमेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : <u>प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**<u>बाब क्र.८ : खेरवाडी जंक्शन येथील उड्डाणपुलाच्या लघुत्तम निविदेस मान्यता देणेबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत खेरवाडी जंक्शन वरील उड्डाणपूलाकरिता निविदा मागविण्यात आल्या. उड्डाणपुलाच्या कामाची अंदाजित किंमत रु. ३२ कोटी इतकी आहे. प्राप्त निविदेपैकी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची निविदा रक्कम रु. २१,९६,००,०००/- ही लघुत्तम असून निविदेतील सर्व अटीं व शर्तीची पूर्तता करणारी व सुसंवादी आहे.

८.२ अति. महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, यापूर्वी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत खेरवाडी जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु मुंबई वाहतुक विभागाने पश्चिम द्रुतगती महामार्गावर त्यावेळेस सुरु असलेल्या इतर उड्डाणपूलांच्या बांधकामामुळे व खेरवाडी येथील मोठया खुल्या नाल्यावर स्लॅब टाकण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी नाकारल्याने सदर काम हाती घेता आले नाही. श्री. ना.वि.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, कलानगर येथील भुयारी मार्ग व खेरवाडी जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या वाहतूकीस योग्य समन्वय साधावा.

८.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर काम सुरु असतांना खेरवाडी जंक्शन येथे वाहतुकीचे नियोजन कसे करणार व ती जबाबदारी कोणाची आहे? यावर उत्तर देताना महानगर आयुक्तांनी असे विषद केले की, याबाबत कंत्राटदाराने वाहतूक विभागातून या कामाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र कंत्राटदारांना दिल्यानंतर त्या प्रमाणपत्रातील ज्या अटी व शर्ती आहेत त्यांचे विहित कालावधीत पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. याबाबत अति. महानगर आयुक्त (१) यांनी असेही सांगितले की, उड्डाणपूलाचे बांधकाम करतेवेळी पर्यायी मार्ग म्हणून सेवारस्त्यांचा उपयोग करण्याचे प्रस्तावित आहे.

८.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२२२ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा

..२०/-

आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, पश्चिम द्रुतगती महामार्गावरील खेरवाडी येथील उड्डाणपूलाचे बांधकामाकरिता मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.२१,९६,००,०००/- (रुपये एकविस कोटी शहाण्णव लाख फक्त) अधिक निविदेनुसार देय भाववाढ स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे अधिकार होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी सहार उन्नत रस्त्याच्या बांधकामासाठी सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरीबाबत.**

९.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी सहार उन्नत रस्त्याचे बांधकाम हाती घेतले आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पव्याप्तीत बदल झाल्यामुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत वाढ झालेली आहे. यासंदर्भात सविस्तर सादरीकरणाव्दारे प्रकल्पाच्या मूळ व्याप्तीमध्ये झालेली वाढ आणि किंमतीत झालेल्या वाढीची माहिती सादर करण्यात आली. मुळ व्याप्तीत झालेल्या बदलांची आणि सुधारीत किंमतीची कारणमिमांसा कार्यकारी समितीच्या समोर विषद केली. तसेच सादरीकरणाव्दारे प्रस्तावित प्रकल्पाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणारे व येणारे वाहतूकीचे नियोजनाबद्दल विस्तृत चर्चा केली. तसेच सदर प्रकल्प पूर्ण करण्यात येणा-या समस्यांचे देखील विवेचन केले व प्रकल्पाची सद्यस्थिती कार्यकारी समितीसमोर सादर केली.

९.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी खालीलप्रमाणे प्रकल्पाच्या मुळ किंमतीत झालेल्या वाढीचे विवेचन केले :-

| अ.क्र. | तपशील | किंमत रु. कोटी |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाच्या कंत्राटाची सुधारीत किंमत | ३७९.५५ |
| २. | मलनि:सारण वाहिनीचे स्थानांतरणाचा खर्च | ८.५० |
| ३. | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचा खर्च | १२.६६ |
| | **प्रकल्पाचा एकूण सुधारीत खर्च** | ४००.७१ |

९.३ महानगर आयुक्तांनी कार्यकारी समितीच्या असेही निदर्शनास आणून दिले की, सदर प्रकल्पाच्या मूळ खर्चापैकी रु.२८७.३७ कोटींचा भार प्राधिकरण व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ खाजगी मर्यादित (MIAL) हे (५३.९७) : (४६.०३) या प्रमाणात अनुक्रमे उचलत आहेत. सांमजस्य कराराप्रमाणे याच प्रमाणात प्रकल्पाच्या एकूण रु.४००.७१ कोटीच्या सुधारीत खर्चाचा भार देखील प्राधिकरण व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ खाजगी मर्यादित (MIAL) हे उचलणार आहेत.

९.४ त्या अनुषंगाने कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी सदर सुधारीत रक्कमेचा भार मे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ खाजगी मर्यादित (MIAL) व प्राधिकरण हे सांमजस्य कराराप्रमाणे उचलणार असल्याने, एकूणच प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीचा पूर्ण भार हा प्राधिकरणावर येत नसल्याने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसावी असे मत दर्शविले.

९.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२२३ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, "पश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी

सहार उन्नत रस्त्याचे बांधकाम करणे" या प्रकल्पाच्या एकूण सुधारीत अंदाजपत्रकास खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्रकल्पाच्या मूळ व्याप्तीत प्रकल्पाच्या आखणीमध्ये बाधित होणा-या जमिनीच्या हस्तांतरणाचा प्रश्न, स्थानिक परिस्थिती अनुरुप अडथळे व सदर प्रकल्प विमानतळाच्या अगदीच जवळ असल्याने विमानाच्या उड्डाणाच्या मार्गात येणा-या भागातील प्रकल्पाची उंची सिमित झाल्याने पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहन भुयारी मार्गाच्या संरचनेत झालेला बदल, प्रकल्पाच्या लांबीत झालेली वाढ, प्रकल्पात अतिरीक्त असे वाहन भुयारी मार्ग इ. बदलांसह व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या खर्चासह प्रकल्पाच्या एकूण रक्कम रु. ४००.७१ कोटीच्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, सामंजस्य कराराप्रमाणे, अतिरिक्त खर्चाचा भार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ खाजगी मर्यादित यांनी अनुक्रमे ५३.९७ : ४६.०३ या प्रमाणात उचलण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१०: मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर बांधण्यात आलेल्या ४ उड्डाणपुलांवर ध्वनीरोधक बसविणे कामाकरिता "केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान, नवी दिल्ली" या संस्थेची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत.**

१०.१ उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २००७ रोजी झालेल्या २२२व्या बैठकीतील निर्णयानुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर खालील ४ उड्डाणपूलांचे बांधकाम करण्यात आले :-

**पॅकेज - १**

१. सायन हॉस्पिटल (लांबी ५९० मी.)

२. किंग्ज सर्कल - तुळपुळे चौक (लांबी १४५४ मी.)

३. हिंदमाता जंक्शन (लांबी ४८० मी.)

पॅकेज - २

४. भारतमाता - लालबाग (लांबी २४०० मी.)

उपरोक्त चारही उड्डाणपुलांची बांधकामे पूर्ण झालेली असून सन २०११ मध्ये सदर उड्डाणपूल वाहतूकीस खुले करण्यात आलेले आहेत.

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासनाने दिनांक २१ एप्रिल, २००९ रोजीच्या त्यांच्या निर्णयानुसार शहरी भागातील उड्डाणपुलांवर ध्वनी प्रदूषणास आळा घालणेसाठी ध्वनीरोधक बसविणे इत्यादी उपाय अवलंबणे बंधनकारक आहे. तद्नुषंगाने दिनांक २ ऑगस्ट, २०११ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३२ व्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पॅकेज-१ व पॅकेज-२ या उड्डाणपुलांवर ध्वनीरोधक बसविणेकरिता प्रत्येकी रु.१७ कोटी म्हणजेच एकूण रु. ३४ कोटी खर्चास मान्यता दिलेली आहे.

१०.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे ध्वनी प्रदुषणाचा अभ्यास, मूल्यमापन, संकल्पचित्र व ध्वनीरोधकाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी अनुभवी व तज्ञ संस्थेचा सहभाग आवश्यक आहे. यास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पॅकेज-१ व पॅकेज-२ या उड्डाणपुलांवर ध्वनीरोधक लावणेकामी सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक ठरते. याकरिता सल्लागाराकडून विनंती प्रस्तावाकरिता (RFP) दिनांक ०३ डिसेंबर, २०१२ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसारीत करण्यात आली आणि निविदा पूर्व बैठक दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी घेण्यात आली. विनंती प्रस्ताव स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी दिनांक ४ जानेवारी, २०१३ पर्यंत ४ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. (सूची खालीलप्रमाणे) :-

| | |
|---|---|
| १. | M/s. Progetti e servizi India Pvt. Ltd. |
| २. | M/s. Metalmeccanica Fracasso Pvt.Ltd. |
| ३. | M/s. Central Road Research Institute |
| ४. | M/s. Mahabal Enviro Engineers Pvt.Ltd. |

१०.४ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असेही सांगितले की, विनंती प्रस्तावात नमूद केलेल्या खंड ५ अन्वये ज्या सल्लागारांचे तांत्रिक प्रस्तावाला ७०% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले त्या सल्लागारांना पात्र ठरविण्यात येईल व त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. M/s. Mahabal Enviro-Engineers Pvt.Ltd. कंपनीच्या तांत्रिक प्रस्तावास ७०% पेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्याकारणास्तव त्यांचा वित्तीय प्रस्ताव उघडण्यात आला नाही. तांत्रिक निकषानुसार ३ सल्लागारांना ७०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून, त्यांचे वित्तीय प्रस्ताव दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी सल्लागारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात आले. वित्तीय प्रस्तावामध्ये सल्लागारांनी मागणी केलेली फी (सेवाकर वगळून) पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सल्लागाराचे नाव | एकत्रित नमूद केलेली फी (रु.) | आर्थिक गुण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | M/s. Progetti e servizi India Pvt. Ltd. | ५३,००,०००/- | १००.०० |
| २ | M/s. Metalmeccanica Fracasso Pvt. Ltd. | ९२,००,०००/- | ५७.६१ |
| ३ | M/s. Central Road Research Institute | ६८,००,०००/- | ७७.९४ |

विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व वित्तीय गुण संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ८०% भार आणि आर्थिक निकषाला २०% भार देण्यात आले. त्याप्रमाणे संयुक्त निकष खालील तक्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र. | सल्लागाराचे नाव | तांत्रिक गुण | आर्थिक गुण | संयुक्त गुण (०.८x तां.गु.) + (०.२ x आ.गु.) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १ | M/s. Progetti e servizi India Pvt. Ltd. | ९०.०५ | १००.०० | ९२.४० | H2 |
| २ | M/s. Metalmeccanica Fracasso Pvt. Ltd. | ७२.६२५ | ५७.६१ | ६९.६२ | H3 |
| ३ | M/s. Central Road Research Institute | ९९ | ७७.९४ | ९४.७९ | H1 |

विनंती प्रस्तावाच्या खंड ५ नुसार "केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान, नवी दिल्ली" यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषानुसार सर्वोच्च गुण असल्यामुळे "केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान (CRRI), नवी दिल्ली" यांची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

१०.५ तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२२४ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, "केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान, नवी दिल्ली" या संस्थेच्या प्रस्तावाचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पॅकेज-१ व पॅकेज-२ उड्डाणपुलांवर ध्वनीरोधक बसविण्याकामी सल्लागार म्हणून काम करण्यासाठी रु.६८.०० लाख (रुपये अडुसष्ट लाख) (सेवाकर वगळून) इतक्या रक्कमेकरिता नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागाराच्या एकूण खर्चाच्या २० टक्के पर्यंतच्या अतिरिक्त मनुष्यबळासाठी लागणा-या तफावत खर्चास मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब क्र.१:</u>** **<u>विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत शिरसाड-अंबाडी रा.म.क्र.४० चे २२.७० कि.मी. साठी रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या (पॅकेज क्र.१) कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागांराची नियुक्ती करणेबाबत. (उर्वरित कामे)</u>**

Mgr Com...

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत शिरसाड ते अंबाडी रा.म. क्र.४० चे २२.७० कि.मी. साठी रुंदीकरण व सुधारणा

करण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून पूर्वी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये मे. एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि., मुंबई यांची लघुत्तम निविदा प्रकल्प किंमतीच्या २.२५% दराची कार्यकारी समितीच्या दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीत स्विकृतीसाठी सादर करण्यात आली होती. सदरील बैठकीमध्ये ठराव क्र.१२०७ अन्वये मे.एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि., मुंबई यांच्यावरील लालबाग उड्डाणपुलाच्या संदर्भातील कार्यवाही अंतिम होईपर्यंत सदरील निविदा स्थगित करणेबाबत निर्णय घेण्यात आला. कार्यकारी समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या २३५व्या बैठकीत, मागील बैठकीच्या कार्यवृत्तावर चर्चा करतांना मे. एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि., मुंबई यांची निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यात येत असल्याबाबत कार्यकारी समितीला अवगत केले आहे. विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत शिरसाड-अंबाडी रा.म.क्र.४० चे २२.७० कि.मी. साठी रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या कामासाठी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स (इं) लि., मुंबई यांची लघुत्तम निविदा स्विकृत करुन त्यांना प्राधिकरणाकडून दिनांक २६ मार्च, २०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून त्यांचा काम पुर्ण करण्याचा कालावधी हा २४ महिने (पावसाळयासहीत) आहे. त्या अनुषंगाने मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर्स (इं) लि., मुंबई यांनी कामासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व मनुष्यबळ कामाच्या ठिकाणी उपलब्ध करुन दिले असून काम प्रगतीपथावर आहे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, कंत्राटदाराला प्राधान्याने पुल व मो-यांची सविस्तर संकल्पने तयार करुन, बांधकामासाठी आवश्यक असलेले नकाशे प्राधिकरणाकडून पुरविणे आवश्यक आहे. संकल्पचित्रे तयार करणे, कामाची दैनंदिन देखरेख करणे व गुणवत्तापुर्वक काम प्रगतीपथावर ठेवण्यासाठी प्राधिकरणाकडे आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नाही. यास्तव मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांची कामाची निकड विचारात घेऊन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती होईपर्यंत काळजीवाहू प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सदरील काम करण्यास प्राधिकरण निश्चित करेल त्या दराने त्यांची सहमती दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये मनुष्यबळाच्या यादीसह प्राधिकरणास सादर केली. त्यानुरुप प्राधिकरणाने ३ महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांची काळजीवाहू प्रकल्प व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली आहे. सदरील कामासाठी प्रथमतः दिनांक ०२ नोव्हेंबर, २०११ रोजी विकलेल्या ११ निविदांपैकी ९ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये मे. माहिमतूरा कन्सल्टंट्स् प्रा.लि. यांची

०.८९७% प्रकल्प किंमतीच्या दराची निविदा प्राप्त झाली होती. तथापि, त्यांच्या विरुध्द असलेले आरोप विचारात घेऊन सदरील निविदा रद्द करण्यात आली. तद्नंतर याच कामासाठी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या निविदा सुचनेव्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण ६ निविदाकारांनी निविदा खरेदी केल्या होत्या. त्यानुसार सर्व ६ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. मे. एस.एन. भोबे आणि असोसिएट्स प्रा.लि., मुंबई यांची लघुत्तम निविदा प्रकल्प किंमतीच्या २.२५% दराची कार्यकारी समितीच्या दिनांक १०.०७.२०१२ रोजी झालेल्या २३४व्या बैठकीत सदरील निविदा स्थगित करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

मुख्य अभियंता यांनी दैनिक 'फ्री प्रेस जर्नल' व दैनिक 'पुढारी' या वृत्तपत्रात दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१२ रोजी इंग्रजी व मराठी भाषेत तिसरी निविदा सुचना प्रसिध्द केली आहे. सदर कामांची निविदा सुचना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी अभियांत्रिकी विभागामार्फत दिनांक ८ नोव्हेंबर, २०१२ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आली. तथापि तांत्रिक कारणांमुळे दिनांक ०१.११.२०१२ ते दिनांक २०.११.२०१२ या दरम्यान प्राधिकरणाचे संकेत स्थळ बंद असल्यामुळे दिनांक २१.११.२०१२ रोजी प्रसिध्द झाली. निविदा सुचनेनुसार निविदा विक्रीचा कालावधी दिनांक ०५.११.२०१२ ते दिनांक २१.११.२०१२ पर्यंत होता. या कालावधीमध्ये झालेल्या निविदा विक्रींची संख्या विचारात घेऊन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक ३०.११.२०१२ पर्यंत वाढविण्यात आला. एकुण ४ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी निविदा संच खरेदी केले आहेत. मुख्य अभियंता यांनी दिनांक १२.११.२०१२ रोजी निविदापूर्व बैठक घेऊन सल्लागारांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा खुलासा व सामाईक बदल संच दिनांक १९.११.२०१२ व दिनांक २७.११.२०१२ रोजी निर्गमित केले आहेत. सदरील कामासाठी निविदा सादर करण्यासाठी निर्धारित केलेल्या दिनांक ०४.१२.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत १ निविदाकारांनी निविदा सादर केली. त्याच दिवशी निविदाकारांच्या उपस्थितीत दुपारी ४.०० वा. निविदा उघडण्यात आली. निविदा सुचनेअंतर्गत तसेच निविदेतील निर्धारित केलेल्या निविदा पात्र निकषाप्रमाणे प्राप्त निविदेतील पाकिट क्र.१ मधील कागदपत्रांची छाननी करण्यात आली असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | पात्रता |
|---|---|---|
| १ | मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. | सर्व निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र. |

निविदाकार हे निविदा शर्तींची पुर्तता करत असल्यामुळे निविदाकारांचा वित्तीय देकार दि.१०.१२.२०१२ रोजी मुख्य अभियंता यांनी निविदाकारांच्या समक्ष उघडला असून त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | देकार | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. | ४.९५% (प्रकल्प किंमतीच्या)+(सेवाकर) | प्रथम लघुत्तम |

लघुत्तम देकारकार मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांना सदरील देकार कमी करण्याबाबत प्राधिकरणाकडून दिनांक १०.१२.२०१२ रोजी विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा देकार १.१७% ने कमी करुन सुधारीत देकार ३.७८% प्रकल्प किंमतीच्या + सेवाकर असा अंतिमतः देऊ केला आहे. सदरील कामाच्या जवळच्या कामासाठी प्राधिकरणाने प्रकल्प किंमतीच्या ३.४०% दराची मे.आरटीफॅक्ट प्राजेक्ट ली. यांची नालासोपारा निर्मळ रोड पॅकेज क्र.७ स्विकारलेली आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निविदा स्विकृती समितीच्या बैठकीत सदरील प्राप्त देकारावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच सदरील निविदेमध्ये निश्चित केलेल्या फी अदागयीच्या पध्दतीवरही चर्चा करण्यात आली. तसेच निविदाकाराने सादर केलेल्या निविदेच्या समर्थनावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. सदरील कामासाठी आतापर्यंत ३ वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच कामाच्या ठिकाणी तातडीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती अनिवार्य आहे. त्यामुळे प्राप्त निविदाकाराशी आणखी दर कमी करणेबाबत वाटाघाटी कराव्यात. त्या अनुषंगाने पुनश्च दिनांक २१.०१.२०१३ रोजी निविदाकाराशी वाटाघाटी करण्यात आली. आता अंतिमतः निविदाकाराने ३.३३% प्रकल्प किंमतीचा + (सेवाकर) देकार देऊ केला आहे. सदरील बैठकीत प्राप्त देकारावर सविस्तर चर्चा करुन मे. मोनार्च सर्व्हेयर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांची लघुत्तम निविदा वाटाघाटी नंतर मान्य करण्यास्तव शिफारस केली आहे.

चर्चेदरम्यान, कार्यकारी समिती सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे विचारले की, जर निविदा जास्त दराची प्राप्त झाल्यास प्रकल्प व्यवस्थापनाच्या फी मध्ये वाढ होणार आहे का? यावर मुख्य अभियंता यांनी असा खुलासा केला की, प्रकल्पाची किंमत निविदेमध्येच निश्चित करण्यात आली असुन ती रु.१०२.५ कोटी आहे. त्यावरच आधारीत प्रकल्प व्यवस्थापनाची फी आहे. त्यामुळे यात बदल होणार नाही.

तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२२५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत शिरसाड-अंबाडी रा.म. क्र.४० चे २२.७० कि.मी. साठी रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या (पॅकेज क्र.१) कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांची प्रकल्प किंमतीच्या ३.३३% + सेवाकर दराची निविदा किंमत रु.३,४१,३२,५००/- (तीन कोटी एकेचाळीस लाख बत्तीस हजार पाचशे रुपये फक्त) स्विकृतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे व त्यापोटी देय होणा-या अदागयी रक्कम रु.३,४१,३२,५००/- (तीन कोटी एकेचाळीस लाख बत्तीस हजार पाचशे रुपये फक्त) खर्चास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

पटल बाब क्र.२: विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करावयाच्या अतिरिक्त कामांकरिता निविदा पूर्व कामे व भुसंपादन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत.

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्ण केलेल्या व प्रगतीपथावर असलेल्या कामांची उपयुक्तता पाहून या प्रकल्पाअंतर्गत अतिरिक्त महत्वांच्या कामाचा समावेश करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून मोठया प्रमाणात मागणी येत आहे. त्यापैकी मुंबई महानगर प्रदेशामधील दळणवळणाच्या दृष्टिने महत्वाचे असणारे काही

प्रकल्प सन २०१३-२०१४ च्या वार्षिक नियोजनामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. यास्तव या प्रकल्पांची वास्तववादी अंदाजपत्रके तयार करणे, आवश्यक तेथे भूसंपादन करणे, हे करावे लागणार आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्प खालील प्रमाणे आहेत:-

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची व्याप्ती | | | | अंदाजित किंमत (रु.कोटीत) | कामाची उपयुक्तता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रस्त्याची लांबी कि.मी. | पुलाची संख्या | उड्डाण पुलाची संख्या | रेल्वे उड्डाण पुलाची संख्या | | |
| १. | कल्याण शहर वळण रस्ता बांधणे. | २९.७० | १.०० | १.०० | ४.०० | ३१२.११ | १) कल्याण शहरातील बदलापूर कर्जत परीसरात जाणारी वाहनवर्दळ या मार्गे वळविणे शक्य होणार आहे. तसेच कल्याण शहर हे रोड नेटवर्कला जोडले जाणार आहे.<br>२) उल्हास नदीवर पुल, कटाईनाका येथे उड्डाणपूल, दिवा वसई रेल्वे मार्गावर भोपर येथे २ व मोटागांव येथे १ रेल्वे उड्डाणपुल बांधणे मध्य रेल्वे मार्गावर मांडा गांवाजवळ रेल्वे उड्डाणपुल बांधण्याचा समावेश आहे. |
| २. | राज्य मार्ग क्र.४० वरील शिरगांव फाटा ते राष्ट्रीय महामार्ग क्र.३ पडघा ते टिटवाळा- राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ ते कल्याण-कर्जत राज्य मार्ग क्र.३५ वरील बदलापूर पर्यंतचे चौपदरी रस्त्याचे बांधकाम व भूसंपादन करणे | ३७.०० | ४.०० | ०.०० | २.०० | ३५९.६६ | १) कल्याण शहरामध्ये बाहेरुन येणारी अर्नाळा परीसरातील वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यासाठी आवश्यक.<br>२) काळू, भातसा, उल्हासनगर व बारवी नदीवर पुल बांधणे.<br>३) मध्य रेल्वे मार्गावर गोळवली व बदलापूर गांवाजवळ रेल्वे उड्डाणपुल बांधणे. |

..३१/-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | टाका कॉलनी ते पळस्पे फाटा राष्ट्रीय मार्ग क्र.४ चे रुंदीकरण व सुधारणा | १.७३ | २.०० | ०.०० | ०.०० | ३७.२० | १) पनवेल शहरातील राष्ट्रीय महामार्ग अरुंद असल्यामुळे होणारी वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी आवश्यक. २) गाढी व काळुंद्री नदीवर पुल बांधणे व अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक. |
| ४. | खोपोली शहर वळण रस्ता | ५.८० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३०.०० | औद्योगिक परिसरातील वाहतूकीसाठी आवश्यक |
| ५. | रेवस कारंजा रस्त्यावर रेवस खाडीवर पुल बांधणे | ८.०० | १.०० | ०.०० | ०.०० | ४०३.३१ | नवी मुंबईशी जवळच्या मार्गाने रायगड जिल्हयातील रस्ते जोडण्यासाठी आवश्यक. |
| ६. | भिवंडी वळणरस्त्याचे बांधकाम | १२.०० | २.०० | ०.०० | ०.०० | १२०.०० | भिवंडी शहरातील वाहनवर्दळीचा ताण कमी करण्यासाठी सिटीएस मध्ये या रस्त्याची शिफारस केली आहे. |
| ७. | नेरळ दस्तुरी रस्त्याची सुधारणा करणे. | ८.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २०.०० | माथेरान या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी आवश्यक |
| ८. | दस्तुरी माथेरान या पथमार्गाचे सुशोभिकरण करणे. | २.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २०.०० | माथेरान या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी आवश्यक |
| **एकुण** | **८ प्रस्तावित कामे** | १०४.२३ | १०.०० | १.०० | ६.०० | १३०२.२८ | |

महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्रस्तावित कामांमध्ये मोठया खाडीवरील पुलांचा, रेल्वे उड्डाणपूल तसेच उड्डाणपूल बांधण्याचा समावेश आहे तर काही कामे विकास आराखडयातील मंजुर डि.पी. रस्ते आहेत. त्यामुळे सदरील प्रकल्पांना प्रकल्प हाती घेण्यापूर्वी विविध विभागांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच ब-याचवेळेस प्रकल्प मंजूर करतांना संबंधित विभागांकडुन प्रकल्प व्याप्तीमध्ये मोठया प्रमाणात बदल सुचविण्यात येतात. त्यामुळे प्रकल्प किंमतीत तसेच प्रकल्प कालावधीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होते. यास्तव सदरील कामांच्या निविदा निश्चित करण्यापूर्वी ही सर्व कामे पुर्ण करुन प्रकल्प हाती घेण्याच्या दृष्टिने व भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण

करण्याच्या दृष्टिने निविदा पूर्व कामे पुर्ण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. कामाच्या व्याप्तीचा सविस्तर आढावा घेऊन कामाच्या सर्वेक्षणाचे व भूसंपादन तसेच निविदापुर्व सर्व बाबींसाठी येणा-या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-२०१३ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रकास किंमत रु.१५.२९ कोटी खर्चास मुख्य अभियंता यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदरील कामाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट असणा-या कामांच्या काही बाबींसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीत दर समाविष्ट नसल्यामुळे या कार्यालयाच्या पुर्व अनुभवावर आधारीत विविध बाबींचे दरपृथःकरण तयार करुन ते दर विचारात घेतले आहेत. कामाचे विशिष्ट स्वरुप व बाजारामध्ये त्यासाठी असणा-या दरांची विविधता विचारात घेऊन या कामांसाठी ठोस पध्दतीची निविदा मागविण्यात आली. मुख्य अभियंता यांनी दैनिक 'सामना' व दैनिक 'डिएनए' या वृत्तपत्रात दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१२ रोजी मराठी व इंग्रजी भाषेत निविदा सुचना प्रसिध्द केली आहे. सदर कामांची निविदा सुचना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी अभियांत्रिकी विभागामार्फत दिनांक ८ नोव्हेंबर, २०१२ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आली होती. तथापि तांत्रिक कारणांमुळे दिनांक १.११.२०१२ ते दिनांक २०.११.२०१२ या दरम्यान प्राधिकरणाचे संकेत स्थळ बंद असल्यामुळे दिनांक २१.११.२०१२ रोजी प्रसिध्द झाली. निविदा सुचनेनुसार निविदा विक्रीचा कालावधी दिनांक ६.११.२०१२ ते दिनांक २०.११.२०१२ पर्यंत होता. या कालावधीमध्ये एकुण ७ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी निविदा संच खरेदी केले आहेत. मुख्य अभियंता यांनी दिनांक १२.११.२०१२ रोजी निविदापूर्व बैठक घेऊन सल्लागारांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा खुलासा व सामाईक बदल संच दिनांक १९.११.२०१२ रोजी निर्गमित केले आहेत. सदरील कामासाठी निविदा सादर करण्यासाठी निर्धारित केलेल्या दिनांक २७.११.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ३ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. त्याच दिवशी निविदाकारांच्या उपस्थितीत दुपारी ४.०० वा. निविदा उघडण्यात आल्या. निविदा सुचनेअंतर्गत तसेच निविदेतील कलम ५ (पृ.क्र.१०) अन्वये निर्धारित केलेल्या निविदा पात्र निकषाप्रमाणे प्राप्त निविदेतील पाकिट क्र.१ मधील कागदपत्रांची छाननी करण्यात

..३३/-

आली असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | पात्रता |
|---|---|---|
| १ | मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. | सर्व निकषांची पुर्तता करीत असल्याने पात्र. |
| २ | मे. पी.एन. शिदोरे, सिव्हील इंजिनियर (इं.) प्रा.लि. | आर्थिक उलाढाल कमी असल्यामुळे अपात्र. |
| ३ | मे. रोडीक कन्सल्टंट प्रा.लि., नोयाडा, नवी दिल्ली. | सर्व निकषांची पुर्तता करीत असल्याने पात्र. |

उपरोक्त ३ पैकी २ निविदाकार हे निविदा शर्तींची पुर्तता करत असल्यामुळे त्यांच्या तांत्रिक गुणवत्तेची तपासणी करण्यात आली असून निविदेमध्ये नमुद केलेल्या गुणसंख्येनुसार मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांना ८९ व मे. रोडीक कन्सल्टंट प्रा.लि., नोयाडा, नवी दिल्ली यांना ९२ गुण प्राप्त झाले आहेत. निविदेमध्ये कमीत कमी पात्रता गुणसंख्या ७५ गुण अशी नमुद करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही निविदाकारांचा वित्तीय देकार दिनांक १० डिसेंबर, २०१२ रोजी मुख्य अभियंता यांनी निविदाकारांच्या समक्ष उघडले असून त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | देकार (रक्कम रु.कोटीत) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. | १४.२२ | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. पी.एन. शिदोरे, सिव्हील इंजिनियर (इ.) प्रा.लि. | उघडण्यात आली नाही | अपात्र |
| ३ | मे. रोडीक कन्सल्टंट प्रा.लि., नोयाडा, नवी दिल्ली. | १७.५० | व्दितीय लघुत्तम |

महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, लघुत्तम देकारकार मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांना सदरील देकार कमी करण्याबाबत प्राधिकरणाकडून दिनांक १० डिसेंबर, २०१२ रोजी विनंती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्यांनी त्यांचा देकार २% ने कमी करुन सुधारीत देकार रु.१३,९३,५६,०००/- अंतिमतः देऊ केला होता. हा देकार मंजुर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ५.२७%कमी दराचा आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त (१)

यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निविदा स्विकृती समितीच्या बैठकीत सदरील प्राप्त देकारावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच सदरील निविदेमध्ये निश्चित केलेल्या फी अदागयीच्या पध्दतीवरही चर्चा करण्यात आली. निविदा शर्तीनुसार सल्लागारांने टप्प्याटप्प्याने काम करावयाचे आहे. त्यांनी प्रत्येक टप्प्यासाठी मुख्य अभियंता यांची मान्यता घेणे अपेक्षित आहे. तसेच सदरील निविदेतील कुठलेही काम प्राधिकरणाच्या सोईनुसार कुठल्याही टप्प्यावर अंतिम करण्याचा अधिकार प्राधिकरणास ठेवण्यात आला आहे. तसेच अशा प्रकरणी सल्लागाराची अंतिम फी निश्चित करण्याबाबत कार्य पध्दतीही नमुद करण्यात आली आहे. तसेच निविदाकाराने सादर केलेल्या निविदेच्या समर्थनावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये असे निर्दशनास आले की, काही प्रस्तावित रस्ते हे ग्रामीण भागातील असल्यामुळे आणखी दर कमी करणेबाबत निविदाकाराशी वाटाघाटी कराव्यात. त्या अनुषंगाने पुनश्च दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी निविदाकाराशी वाटाघाटी करण्यात आली. आता अंतिमतः निविदाकाराने रु.१३.७५ कोटी + सेवाकर किंमतीचा देकार देऊ केला आहे. सदरील बैठकित प्राप्त देकारावर सविस्तर चर्चा करुन मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांची लघुत्तम निविदा वाटाघाटी नंतर मान्य करण्यास्तव शिफारस केली आहे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या कामाबाबत श्री.दिनेश कृष्णा शिंदे यांची तक्रार प्राप्त आहे. तक्रारीमध्ये मुख्यतः दोन बाबींवर भर देण्यात आला आहे. पहिल्या बाबीत सदरील काम विशिष्ट निविदाकाराला देण्यासाठी संकेत स्थळावर निविदा सादर करावयाच्या फक्त २ दिवस अगोदर संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. त्यामुळे आधुनिक काळात संकेत स्थळाचा वापर करणा-या लोकांपर्यंत सदर निविदांची जाहिरात खूप उशिरा पोहोचली, त्यामुळे ब-याच कंपन्याना सदर विषयांकित निविदा दाखल करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही असे नमुद केले आहे. दुसरी बाब म्हणजे आजतागायत यापुर्वीच्या एकूण १ ते ७ प्रकल्पांची लांबी १४४.६२ कि.मी. होती व त्याचा खर्च २ कोटी ५६ लाख झाला होता व या १०४ कि.मी. लांबीच्या कामासाठी १४ कोटी २२ लाख खर्चाला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे वैयक्तिक आर्थिक हितासाठी प्राधिकरणाचे कोटयावधी रुपयाचे नुकसान झाल्याचे तक्रारदाराने प्राधिकरणास लेखी कळविले आहे. प्रत्यक्षात विषयांकित कामासाठी निविदा विक्री दिनांक ०६.११.२०१२ ते दिनांक २०.११.२०१२ पर्यंत होती. तसेच निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख २७.११.२०१२ अशी

होती. याबाबतची निविदा सुचना दैनिक 'सामना' व दैनिक 'डिएनए' या वृत्तपत्रात दिनांक ०६.११.२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामांची निविदा सुचना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी अभियांत्रिकी विभागामार्फत दिनांक ८.११.२०१२ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आली होती. तथापि, प्राधिकरणाचे सर्व्हर बंद असल्यामुळे प्राधिकरणाचे संकेत स्थळ दिनांक १.११.२०१२ ते दिनांक २०.११.२०१२ पर्यंत बंद असल्याची माहिती व तंत्रज्ञान विभागाने कळविले आहे. त्यामुळे संबंधित निविदा सुचना दिनांक २१.११.२०१२ रोजी प्रत्यक्षात प्रसिध्दीस आली. तक्रारदाराने नमुद केलेल्या १ ते ७ प्रकल्पांच्या कामामध्ये फक्त सर्वेक्षण व भूसंपादन अस्तित्वातील रस्त्याच्या रुंदीकरणासाठी अपेक्षित आहे. तसेच निविदा तयार करणे व इतर बाबींचा त्यात समावेश नव्हता. तसेच प्रस्तावित कामात ११ मोठे पूल/उड्डाणपूल व ६ आर.ओ.बी.चा समावेश आहे. त्यामुळे त्याच्या किंमतीत व प्रस्तावित कामांच्या व्याप्तीतील बदल यामध्ये तफावत आहे. त्यामुळे सदरील तक्रार ही वास्तवावर आधारीत नसल्यामुळे निविदास्विकृत समितीमध्ये चर्चेअंती निकाली काढण्यात आली. मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांचा देकार सर्वात लघुत्तम असून अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा ६.५०% इतका कमी आहे. त्यानुसार, मे.मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांनी समाधानकारक स्पष्टीकरण दिले. चर्चेदरम्यान, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, काम तातडीने पुर्ण करण्याच्या दृष्टिने मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांना प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मनुष्य बळ व यंत्र सामुग्री नियुक्ती करण्याबाबत निर्देश देणे आवश्यक आहे.

तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावात मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२२६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करावयाच्या अतिरिक्त कामांकरिता निविदा पूर्व कामे व भूसंपादन करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती

करणेबाबत मे. मोनार्च सर्व्हेअर आणि इंजिनियरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांची रु.१३,७५,००,०००/- (रुपये तेरा कोटी पंच्याहत्तर लक्ष फक्त) + सेवाकर किंमतीची लघुत्तम ठोस निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**Table Item No.3** **Feasibility study project under Comprehensive Transport System for MMR region through Flanders Investment & Trade Company.**

Metropolitan Commissioner, MMRDA informed that Consulate General of the Kingdom of Belgium in Mumbai has forwarded the Agreement of the Government of Flanders, Belgium. The said agreement is represented by Flanders Investment & Trade Company representing Government of Flanders, to grant a subsidy for a feasibility study on mobility in Mumbai. The Flemish company NP- bridging will carry out feasibility study based on an integral approach, including a complete integration of all infrastructures, keeping in view landscape and urban space with an eye on economic, technical, environmental, social and financial aspects. The feasibility study will be on mobility in Mumbai, integral mobility network (Comprehensive Transport System) and related future development and city expansion (Growth Centers and Multi Modal Corridor).

The Flemish Govt. would provide a subsidy of 50 % of the estimated cost of 1,000,000 Euro (500,000 Euro i.e. Rs. 3.50 Crores). The Flanders Investment & Trade company has confirmed the cost sharing of 50:50 % from Flemish Govt. that approves the subsidy of 500,000 Euro for realization of this master plan whereas MMRDA would provide the other half, namely 500,000 Euro.

The said feasibility study will be carried out in three phases; the payments will be 30% on completion of study, 30 % on submission of the first draft and 40% on submission of feasibility study.

..३७/-

Proposal is submitted to allot the work of the feasibility study of some projects under comprehensive transport system for MMR region through Flanders Investment & Trade Company on 50:50 % cost sharing basis. Executive Committee is requested to approve the proposal in principle. Detailed proposals for individual projects will be submitted for approval of Executive Committee in due course.

Shri Sitaram Kunte, Muncipal Commissioner, Brihanmumbai Muncipal Corporation and Member of Executive Committee pointed out that concerned consulate has recommended a specific company. They should have at least recommended three/four companies, so that Authority can get choice for selection based on the scope of the assignment and their experience in respective fields.

Shri. Debashish Chakrabarty, Principal Secretary, Housing Department and Member of Executive Committee also expressed that getting subsidy is not enough ground for allotment of work directly without inviting tender. If foreign based company desires to work in Mumbai, they should participate in the tenders invited by the Authority.

Shri. Manukumar Shrivastav, Principal Secretary (I), Urban Development Department and Member of Executive Committee submitted that in public tendering system, it is very difficult for foreign based company to get the work under foreign technical exchange programme. Such proposal can be considered with view to get latest international expertise. On this discussion it was decided that initially the Memorandum of Understanding between the two governments shall be signed for such technical collaboration.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने**

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जानेवारी, २०१२ व दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या अनुक्रमे २३३व्या व तहकूब २३३व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाहीतील सूचना क्र. (२) मध्ये स्कॉयवॉकबाबत सविस्तर सादरीकरण करावे व स्कॉयवॉकचा वापर किती पादचारी करतात याची माहिती पुढील बैठकीत सादर करण्यात यावी असे सूचविण्यात आले होते.

..३८/-

याबाबत प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या २३७व्या बैठकीमध्ये महानगर आयुक्त यांनी स्कॉयवॉक प्रकल्पाची सद्यस्थिती दर्शविणारे सादरीकरण केले. या सादरीकरणात बांधण्यात आलेल्या स्कायवॉकबद्दल माहिती, पादचारी गणना तसेच स्कायवॉकवरील खर्च व सुधारीत अंदाजित किंमत याबाबींचा समावेश होता. कार्यकारी समितीने सदर सादरीकरणाची नोंद घेतली. सादरीकरणानंतर, महानगर आयुक्तांना मुंबई शहरामध्ये बांधण्यात आलेले स्कायवॉक प्राधिकरणाकडून जाहिरातीच्या हक्कांसह पुढील देखभाल व कार्यवाहीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश कार्यकारी समितीने दिले.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

————XOX————